जागतिक युवा बुध्दीबळ चॅम्पियनशिप, २०१९ या स्पर्धेसाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांक : पुमाप्र ३५१९ /प्र.क्र.५० /क्रीयुसे -२

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२
तारीख : २० सप्टेंबर, २०१९ .

वाचा -

१. समाजकल्याण सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग शासन निर्णय क्र. राक्रीधो १०९६/ प्र. क्र. ३३०/क्रीयुसे-१, दि. ३१.७.१९९७

२. वित्त विभाग शासन परीपत्रक क्र.अर्थसं-२०१९/प्र.क्र.९२/अर्थ-३;दि.०८.०७.२०१९.

प्रस्तावना -

महाराष्ट्र राज्यात क्रीडा व खेळाच्या विकासासाठी विविध स्तरावर कार्यरत असलेल्या पंजीबध्द संस्था/संघटनांना शासनातर्फे राज्य क्रीडा परिषदेच्या निधीतून अधिकृत राज्य/ राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय स्पर्धा आयोजनाकरिता आर्थिक सहाय्य करण्याची योजना संदर्भ क्र. १ च्या शासन निर्णयान्वये कार्यरत आहे.

अखिल मराठी बुध्दीबळ संघटना, महाराष्ट्र राज्य या संघटनामार्फत जागतिक युवा बुध्दीबळ चॅम्पियनशिप, २०१९ या स्पर्धेचे आयोजन दि. १ ते १३ ऑक्टोबर, २०१९ या कालावधीत मुंबई येथे होणार असून सदर स्पर्धेचे आयोजिन करण्याकरिता निधी उपलब्ध करून देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

शासन निर्णय :-

दि. १ ते १३ ऑक्टोबर, २०१९ या कालावधीत मुंबई येथे पार पडणाऱ्या जागतिक युवा बुध्दीबळ चॅम्पियनशिप, २०१९ या स्पर्धेचे आयोजिनासाठी रु.२००.०० लक्ष (रुपये दोन कोटी फक्त) इतकी रक्कम खर्च करण्यास प्रशास्कीय मान्यता देण्यात येत आहे. तसेच सदर रक्कम आयुक्त, क्रीडा व युवक सेवा यांच्या अधिनस्त ठेवण्यास याद्वारे मान्यता देण्यात येत आहे. सदर देयक कोषागारात सादर करून रु.२००.०० लक्ष (रुपये दोन कोटी फक्त) इतक्या रकमेचा धनादेश अखिल मराठी बुध्दीबळ संघटना, महाराष्ट्र राज्य (All Marathi Chess Association) या संघटनेच्या नावाने काढून त्यांना तो पोचपावती घेऊन द्यावा.

२. उपरोक्त संदर्भात होणारा खर्च "मागणी क्र. ०३, २२०४-क्रीडा व युवक सेवा- १०४ क्रीडा व खेळ (०२) क्रीडा स्पर्धा, (०२) (०३) महाराष्ट्र राज्य क्रीडा परिषदेमार्फ़त नोंदणीकृत क्रीडा संस्थांना सहाय्यक अनुदान (राज्य) (२२०४ १९४३), ३१ सहाय्यक अनुदाने" या लेखाशिर्षाखालील मंजूर तरतूदी मधून भागविण्यात यावा. सदरचे अनुदान ज्या प्रयोजनासाठी मंजूर करण्यात आले आहेत त्याच प्रयोजनासाठी खर्च करण्यात यावे.

३. वित्त विभागाच्या दि.०८.०७.२०१९ च्या शासन परिपत्रकान्वये निधी वितरणाचे अधिकार विभागास आहेत. सदर परिपत्रकातील अटी व सूचनानुसार उपरोक्त तरतूद खर्च करण्याबाबतची कार्यवाही करण्यात यावी. यासाठी संबंधित उपसंचालक व लेखाधिकारी, क्रीडा व युवक सेवा, पुणे यांना आंहरण व संवितरण अधिकारी तर आयुक्त(क्रीडा) यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र. अनौसं ५८२/व्यय-५ ; दि.१७.०९.१९ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०९२११००४५९७५२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by Imtiyaz Mushtaque Kazi
Date: 2019.09.21 10:03:11 +05'30'

(इ. मु. काझी)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.मंत्री, शालेय शिक्षण व क्रीडा यांचे खाजगी सचिव
२. अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
३. आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, पुणे.
४. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
५. महालेखापाल (लेखा व परिक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर
६. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी, (क्रीडा संचालनालयामार्फत).
७. सर्व उप संचालक, क्रीडा व युवक सेवा, (क्रीडा संचालनालयामार्फत).
८. सर्व जिल्हा क्रीडा अधिकारी, (क्रीडा संचालनालयामार्फत)
९. वरीष्ठ कोषागार अधिकारी, पुणे(क्रीडा संचालनालयामार्फत)
१०.वित्त विभाग (व्यय-५), मंत्रालय, मुंबई.
११.सह सचिव (क्रीडा)/ अवर सचिव (क्रीयुसे २ व ३) / कक्ष अधिकारी (अर्थसंकल्प), शा.शि.व क्री.वि., मंत्रालय, मुंबई.
१२.निवडनस्ती, क्रीयुसे-२.